# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण विभाग, ना. म. जोशी मार्ग, प्रभादेवी, मुंबई –४०००१३

**क्र. स.अ. (घ.क.व्य.) जी.द./1464/ दिनांक 25.08.2025**

"**स्वारस्य अभिव्यक्ती**" (E.O.I.)

जी/दक्षिण विभागातील जी/२ डेपो, पांडुरंग बुधकर मार्ग सुका कचरा वर्गीकरण केंद्र चालविण्यासाठी अनुभवी कचरा वेचक संस्था / बचत गट यांची नेमणूक करण्यासाठी नोंदणीकृत ईच्छुक संस्थांकडून सिलबंद अर्ज मागविण्यात येत आहेत.

ईच्छुक संस्थांनी याबाबतची तपशील माहितीसाठी जी/दक्षिण विभागाच्या घन कचरा व्यवस्थापन खात्याच्या सूचना फलकावर तथा सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण विभाग यांच्याकडे संपर्क साधावा.

संस्थांनी जी दक्षिण विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. १५.०९.२०२५ रोजी सायंकाळी ०४.३० वाजेपर्यंत राहील.

खालील बार्बीची पुर्तता केलेली नसल्यास अर्ज अपुरे अनियमित व अवैध ठरवून पुर्णपणे नाकारले जातील.

१. विभागीय क्षेत्रात सुका कचरा वर्गीकरण केंद्र चालविण्यासाठी शासन नोंदणीकृत कचरा वेचक संस्था असणे आवश्यक आहे.

२. सदर संस्थेस ३ वर्षा पेक्षा अधिक काळ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभागीय क्षेत्रात कचरा वेचकाच्या मदतीने सुका कचरा गोळा व वर्गीकरण करण्याचा अनुभव व सद्यस्थितीत महापालिकेबरोबर अशा प्रकारच्या कामात कार्यरत असतील अशा संस्था ह्या सुका कचरा वर्गीकरण केंद्र चालविण्याबाबत अर्ज करण्यास पात्र असतील.

३. सोबत जोडलेल्या परिपत्रकानुसार कागदपत्रे विहित वेळेत कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

सही/-

**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण विभाग**